## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०– २५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)
गणेशखिंड, पुणे–४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०–२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ–मेल : approval@unipune.ac.in

### परिपत्रक क्र. ८७/२०२२

विषय : शैक्षणिक वर्ष २०२१–२२ करीता तासिका तत्वावर नेमणूक करण्यात आलेल्या शिक्षक मान्यतेच्या कालावधीबाबत

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितास कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने दि. १४/११/२०१८ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामध्ये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी तासिका तत्वावरील अध्यापकांची एका शैक्षणिक वर्षासाठी जास्तीत जास्त ०९ महिन्यांकरिता तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्याबाबत आदेश दिलेले आहेत. त्यास अनुसरुन मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी विविध संस्था/महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२१–२२ करीता प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्न विविध अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील तासिका तत्वावरील अध्यापकांच्या पद भरतीसाठी ना–हरकत प्रमाणपत्र दिलेली आहेत. त्यास अनुसरून सदर संस्था/महाविद्यालयांनी विहित प्रक्रियेचा अवलंब करून तासिका तत्वावर नेमणूक करण्यात आलेल्या अध्यापकांना या कार्यालयाकडून दिनांक ३०/०४/२०२२ अखेर तासिका तत्वावर मान्यता देण्यात आलेल्या आहेत. कोरोना प्रार्दुभावामुळे उद्‌भवलेली परिस्थिती तसेच विद्यापीठ परिपत्रक क्र. ७४/२०२२, संदर्भ क्र. पीजीएस/१८५४, दि. २८/०३/२०२२ अन्वये निर्गमित केलेल्या परिपत्रकामध्ये विद्याशाखानिहाय शैक्षणिक वर्ष २०२१–२२ संपुष्टात येण्याचा कालावधी खालीलप्रमाणे नमूद केला आहे.

| | |
|---|---|
| १. मानव विज्ञान विद्याशाखा | दि. २७/०६/२०२२ |
| २. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा(वाणिज्य अभ्यासक्रम) | दि. २७/०६/२०२२ |
| ३. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा (विज्ञान अभ्यासक्रम) | दि. १५/०६/२०२२ |

सबब, उपरोक्त विद्याशाखानिहाय अध्यापकांना विद्यापीठाकडून शैक्षणिक वर्ष २०२१–२०२२ मध्ये तासिका तत्वावर देण्यात आलेल्या शिक्षक मान्यता पत्रातील कालावधी हा दिनांक ३०/०४/२०२२ ऐवजी संबंधित अध्यापक तासिका तत्वावर रुजू झाल्याच्या दिनांकापासून जास्तीत जास्त ०९ महिने अथवा शैक्षणिक वर्ष २०२१–२२ अखेर यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरीता समजण्यात यावा.

विद्यापीठाशी संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील मा. प्राचार्यांनी, वरील बाब सर्व संबंधिताच्या निदर्शनास आणून द्यावी.

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७ )
जा.क्रं. सीसीओ/९२८७ )
दिनांक : 23एप्रिल, २०२२ )

Rasve 23/4/2022
(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

प्रत: मा. प्राचार्य सर्व संबंधित महाविद्यालये